महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

## पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर

# जनावरांचे लसीकरण







### लसीकरण का करावे ?

साथीच्या काही रोगांमुळे (उदा. घटसर्प, फऱ्या) जनावरे तडकाफडकी मरतात. या रोगांची लागण झाल्यानंतर उपचार करण्यास वेळ मिळत नाही. काही रोगांमध्ये (उदा. लाळ्या खुरकूत) मरतूक होत नाही परंतु जनावरे अनुत्पादक होतात किंवा त्यांची उत्पादनक्षमता घटते. परिणामी पशुपालकांचे फार मोठे आर्थिक नुकसान होते. असे संभाव्य साथीचे रोग आपल्या जनावरांना होऊ नये म्हणून लसीकरण करावे.

### गायी–म्हशीतील लसीकरण :

| रोग | | लस केव्हा व किती वेळेस द्यावी ? |
|---|---|---|
| १. घटसर्प | : | एप्रिल–मे महिन्यात वर्षातून एकदा (संकरीत गायी व म्हशीत वर्षातून दोनदा) |
| २. फऱ्या | : | एप्रिल–मे महिन्यात वर्षातून एकदा |
| ३. फाशी/काळपुळी | : | रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागात मे महिन्यात वर्षातून एकदा |
| ४. लाळ्या खुरकूत | : | मार्च व सप्टेंबर महिन्यात वर्षातून दोनदा |

### शेळ्या – मेंढ्यातील लसीकरण :

| रोग | | लस केव्हा व किती वेळेस द्यावी ? |
|---|---|---|
| १. फाशी/काळपुळी | : | रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागात फेब्रुवारी महिन्यात वर्षातून एकदा |
| २. घटसर्प | : | मार्च – एप्रिल महिन्यात वर्षातून एकदा |
| ३. आंत्रविषार | : | एप्रिल – मे महिन्यात वर्षातून एकदा (पुढील दोन मात्रा १५ दिवसाच्या अंतराने) |
| ४. लाळ्या खुरकूत | : | सप्टेंबर व मार्च महिन्यात वर्षातून दोनदा |
| ५. देवी | : | डिसेंबर महिन्यात वर्षातून एकदा (गाभण मेंढ्यांना ही लस देऊ नये.) |
| ६. फऱ्या | : | मे महिन्यात वर्षातून एकदा |

### लसीकरण करण्याच्या १ आठवड्यापूर्वी ........

- जंताचे औषध द्यावे.
- जनावरांच्या अंगावर गोचिडनाशकाची फवारणी करावी.

### लसीकरण करतेवळी........

- लसीकरण निरोगी जनावरांतच करावे.
- दिवसातील थंड वेळेत लसीकरण करावे.
- लसीच्या बॅच क्रमांकाची नोंद ठेवावी.
- शक्यतो एकाच दिवशी एका गावातील सर्व जनावरांचे लसीकरण करावे.

### हे लक्षात ठेवा........

- लस दिल्यानंतर रोगप्रतिकारकशक्ती निर्माण होण्यासाठी २ ते ३ आठवड्याचा कालावधी लागतो.

**उपचारापेक्षा प्रतिबंध बरा ।**
**जनावरांना लसीकरण नियमित करा ।।**

पशुविज्ञान व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग, प.वै.म., उदगीर